# मिठी नदीखालून मेट्रो-३ चे काम

**मुंबई : प्रतिनिधी**

कुलाबा- वांद्रे- सीप्झ या मेट्रो-३ मार्गिकि दरम्यानच्या सर्वात महत्त्वाच्या आणि आव्हानात्मक टप्प्याला आता सुरूवात होणार आहे. मिठी नदीच्या पात्राखालून या प्रकल्पाच्या कामाला लवकरच सुरूवात होणार आहे. कोलकाता भुयारी मेट्रो प्रकल्पामध्ये हुगळी नदीच्या खालून झालेले भुयारीकरण हे भारतातील नदीपात्राखालील पहिले भुयार आहे. मुंबई मेट्रो-३ चे मिठी नदीखालील भुयार हे अशा प्रकारचे दुसरे भुयारीकरण असणार आहे. हे काम फेब्रुवारी २०१९ पासून मेट्रो-३ मार्गिकिचा सर्वात महत्त्वाचा टप्पा म्हणजे पॅकेज-५ मध्ये मुंबईतील एकमेव मिठी नदीच्या खाली जाऊन भुयारीकरण सुरू होणार. हे भुयार ऑक्टोबर २०१९ मध्ये पूर्ण होणार आहे.

मेट्रो-३ प्रकल्पाचा वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स (बीकेसी ते धारावी) हा एकूण १.८२५ किमी लांबीचा पल्ला असणार आहे. म्हणजेच या पट्ट्यात नदीखालून बोगदा खोदला जाणार आहे. एनएटीएम (न्यू ऑस्ट्रियन टनेलिंग मेथड) पध्दतीने भुयारीकरण बीकेसी ते धारावी असे भुयार पाण्याखालून असणार आहे. हे काम ऑक्टोबर २०१९ पर्यंत पूर्ण करण्याचे लक्ष्य आहे. कॉम्प्लेक्स ते धारावीदरम्यान बोगद्याचा काही भाग नदीखाली तर खाली भाग तिवरांच्या खाली असेल. बोरिंग यंत्रे या दोन टनेलचे खोदकाम करतील.



काही भाग नदीच्या पात्रात (खारफुटीमध्ये) तर काही भाग पाण्याखाली असणार आहे. टेराटेक कंपनीने बनवलेले दोन टीबीएम मशीन गोदावरी ३,४ हे अप आणि डाऊन या मार्गावर भुयार खणणार आहेत. अर्थ प्रेशर बॅलन्स ही विशेष क्रियाप्रणाली असलेले टीबीएम कार्यरत असणार आहेत. बीकेसी मेट्रो स्टेशनचा काही भाग नदीच्या पात्रात (खारफुटी) असणार आहे. या प्रकल्पात आतापर्यंत एकूण १७ कि.मी.पेक्षा जास्त लांबीचे बोगदे खणून झाले आहेत. बोगदे खोदण्यासाठी मुंबई ठिकठिकाणी सतरा टनेल बोरिंग मशीन कार्यरत आहेत.